**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 28/08/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील मरामाय नगर काटोल येथे दिनांक 26/08/2021 चे 20.30 वा. ते 27/08/2021 चे 07.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– आकाश दिलीप सयाम वय 21 वर्ष रा. मरामाय नगर काटोल याने त्याची एमएच– 40/बीए– 8147 क्रमांकाची मोटरसायकलचा ही हॅडल लॉक करून आपले घरासमोर उभी ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 25,000/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हान 9545363121 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापरखेडा – दिनांक 18/08/2021 चे 16.00 वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्यीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हि टयुशनला जातो म्हणुन घरातुन निघून गेली. ती त्याच दिवशी सायंकाळी 16.00 वा घरी परत आल्यावर तिने आपले कपडे बॅग मध्ये भरून मला घरी राहायचे नाही असे आईला सांगुन घरून निघुन गेली. फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री सुर्यप्रकाश मिश्रा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर